सन २०१०-११ या सालाकरीता डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजना घोषित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : आयईसी ०१११/प्र.क्र. २/आरोग्य-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १ फेब्रुवारी, २०११.

**वाचा :** १) उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे यांचे पत्र क्रमांक- राआशिसंवि/ नक्र./डॉ.आजोगौपुप्र/१०-११/४३७७-७९/१०, दिनांक १३.१०.२०१०.

**प्रस्तावना :-**

राज्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शासकीय तसेच खाजगी आरोग्य संस्था, त्याचप्रमाणे डॉक्टरांना वैयक्तिक स्वरुपाचे पुरस्कार देऊन प्रोत्साहन देण्याकरीता डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजना राबविण्यात येते. राज्यातील माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे, प्रजनन व बाल आरोग्यविषयी सेवा अधिक प्रभावीपणे देणे, कुटुंब कल्याण उपक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे आणि लोकसहभागातून विविध आरोग्य कार्यक्रम यशस्वी करणे हा या पुरस्कार योजनेमागील महत्वाचा उद्देश आहे.

**शासन निर्णय :-**

सन २०१०-११ या सालाकरीता डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार योजना राबविण्यासाठी योजनेचे स्वरुप आणि आराखडा खालीलप्रमाणे निश्चित करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

**जिल्हास्तरीय पुरस्कार**

| अ.क्र. | संस्था | प्रथम | व्दितीय | तृतीय |
|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य उपकेंद्र | रु.१५ हजार | रु.१० हजार | रु.५ हजार |
| २ | प्राथमिक आरोग्य केंद्र | रु.२५ हजार | रु.१५ हजार | रु.१० हजार |
| ३ | ग्रामीण रुग्णालय अथवा उपजिल्हा रुग्णालय | रु.५० हजार | निरंक | निरंक |

**राज्यस्तरीय पुरस्कार**

| *संस्थासाठी पुरस्कार* | | |
|---|---|---|
| १ | सर्वोत्तम आरोग्य उपकेंद्र | रु.३० हजार |
| २ | आदिवासी क्षेत्रातील सर्वोत्तम उपकेंद्र | रु.३० हजार |
| ३ | सर्वोत्तम प्राथमिक आरोग्य केंद्र | रु.५० हजार |

| *वैयक्तिक पुरस्कार* | | |
|---|---|---|
| १ | खाजगी स्त्री डॉक्टर (आदिवासी क्षेत्र) | रु.२५ हजार |
| २ | खाजगी स्त्री डॉक्टर (बिगर आदिवासीक्षेत्र) | रु.२५ हजार |
| ३ | खाजगी डॉक्टर (आदिवासी क्षेत्र) | रु.२५ हजार |

| | | |
|---|---|---|
| ४ | आदिवासी क्षेत्रातील सर्वोत्तम प्राथमीक आरोग्य केंद्र | रु.५० हजार |
| ५ | सर्वोत्तम ग्रामीण रुग्णालय | रु.७५ हजार |
| ६ | सर्वोत्तम उपजिल्हा रुग्णालय/ जिल्हा रुग्णालय/ स्त्री रुग्णालय | रु.१ लाख |
| ७ | खाजगी संस्था | रु.१ लाख |

| | | |
|---|---|---|
| ४ | खाजगी डॉक्टर (बिगर आदिवासी क्षेत्र) | रु.२५ हजार |
| ५ | शासकीय स्त्री डॉक्टर, आदिवासी क्षेत्र | रु.२५ हजार |
| ६ | शासकीय स्त्री डॉक्टर, बिगर आदिवासी क्षेत्र | रु.२५ हजार |
| ७ | शासकीय डॉक्टर, आदिवासी क्षेत्र | रु.२५ हजार |
| ८ | शासकीय डॉक्टर, बिगर आदिवासी क्षेत्र | रु.२५ हजार |

या योजनेकरिता लागणाऱ्या अनुदानाचे वाटप करण्याचे खालीलप्रमाणे करण्यात यावे :-

| **क्र.** | **राबविण्यात येणारे उपक्रम** | **अपेक्षित खर्च रुपये** |
|---|---|---|
| १ | घडीपत्रिका छपाई/ पुरस्कार योजनेचे निकष व नियम यांची माहिती देणाऱ्या | ५०,०००/- |
| २ | टि.व्ही.स्पॉट निर्मिती व सर्व वाहिन्यावरुन प्रसारण | २१,००,०००/- |
| ३ | आकाशवाणी प्रसारण /रेडिओ जिंगल निर्मिती | ५,००,०००/- |
| ४ | सन्मानचिन्ह खरेदी/प्रशस्तिपत्र छपाई (राज्यस्तर) | ५०,०००/- |
| ५ | सरकत्या संदेशाचे सर्व वाहिन्यांवरुन प्रसारण | ३,६९,५००/- |
| ६ | रोख स्वरुपातील पुरस्कार वितरण व समारंभ आयोजन (जिल्हास्तर) | ४९,५०,०००/- |
| ७ | रोख स्वरुपातील पुरस्कार वितरण (राज्यस्तर) | ६,३५,०००/- |
| ८ | राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ | ३,५०,०००/- |
| ९ | राज्यस्तरीय समिती परीक्षण मंडळ बैठका व इतर किरकोळ प्रवास खर्च, वाहतुक व्यवस्था | १,६०,०००/- |
| १० | राज्यस्तरीय परीक्षण मंडळातील शासकीय सदस्यांना दैंनदिन भत्ता रु. ५००/- प्रमाणे व अशासकीय सदस्यांना दैनंदिन भत्ता रु. १०००/- प्रमाणे एकूण १० दिवसांसाठी होणारा खर्च | १,५०,५००/- |
| ११ | विभागीय स्तरावरील परिक्षण मंडळातील अशासकीय सदस्यांचे मानधन, प्रवास खर्च, वाहतूक व्यवस्था इंधन व किरकोळ खर्च इ.बाबींसाठी प्रती उपसंचालक, प्रभारी मंडळ-रुपये ५०,०००/- याप्रमाणे अनुदान वाटप | ४,००,०००/- |
| १२ | राज्यस्तरीय समिती परिक्षण मंडळ कार्यशाळा आयोजन | ५०,०००/- |
| १३ | मोहिमेची व्यापक प्रसिध्दी वृत्तपत्रातून जाहिरात | २०,००,०००/- |
| १४ | राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभाचे चित्रिकरण व प्रसिध्दी | १,५०,०००/- |
| १५ | पत्रकार परिषद | ३५,०००/- |
| १६ | राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभाचे होर्डींग व बॅनर्स | २,००,०००/- |
| १७ | राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झालेल्या संस्थांचे चित्रिकरण व त्यावर आधारित चित्रपट निर्मिती | ३,५०,०००/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | **१,२५,००,०००/-** |

पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्थांची निवड करण्यासाठी आवश्यक त्या कार्यक्रमाचे वेळापत्रक करण्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा यांच्या मान्यतेने निश्चित करण्यात यावी.

निवडसमितीची रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

**उच्चस्तरीय राज्य निवड समिती**

१) मा.अपर मुख्य सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण - अध्यक्ष
२) मा.आयुक्त (कुटुंब कल्याण) - उपाध्यक्ष
३) मा.संचालक, आरोग्य सेवा - सदस्य
४) मा.अभियान संचालक - सदस्य
५) उप सचिव (आरोग्य ९) - सदस्य
६) उपसंचालक (आयईसी) - सदस्य सचिव

**राज्यस्तरीय निवड समिती**

१) डॉ. डी.एस. डाखुरे, संचालक आरोग्य सेवा, - अध्यक्ष
२) डॉ. उध्दव गावंडे ,अतिरिक्त संचालक (कु.क.) - सदस्य
३) डॉ. व्ही. डी. खानंदे सहसंचालक (कु.क) - सदस्य
४) डॉ. सतीश पवार, सहसंचालक - सदस्य
५) डॉ. अर्चना पाटील, सहसंचालक - सदस्य
६) डॉ पी.आर. जक्कल, सहसंचालक - सदस्य
७) डॉ. प्रकाश डोके, कार्यकारी संचालक एसएचआरसी, पुणे - अशासकीय सदस्य
८) डॉ. अशोक चितळे, निवृत्त सहसंचालक, पुणे - अशासकीय सदस्य
९) डॉ. मधुसूदन कर्नाटकी, निवृत्त सहसंचालक, पुणे - अशासकीय सदस्य
१०) डॉ. किशोर आतनुरकर, नांदेड - अशासकीय सदस्य
११) डॉ. शंतनु अभ्यंकर, वाई - अशासकीय सदस्य
१२) डॉ. विनोद शहा, जनसेवा फौंडेशन, पुणे - अशासकीय सदस्य
१३) श्री. विलास देशपांडे, उपसंचालक (आयईसी) - सदस्य सचिव
१४) पत्रकार - अशासकीय सदस्य
१५) पत्रकार - अशासकीय सदस्य

**गटनिहाय परीक्षण समित्या**

१) आरोग्य उपकेंद्र परीक्षण समिती
२) प्राथमिक आरोग्य केंद्र परीक्षण समिती
३) ग्रामीण रुग्णालय परीक्षण समिती
४) जिल्हा रुग्णालये व स्त्री रुग्णालये , उपजिल्हा रुग्णालये परीक्षण समिती
५) खाजगी संस्था परीक्षण समिती
६) खाजगी डॉक्टर परीक्षण समिती
७) शासकीय डॉक्टर परीक्षण समिती

**प्रत्येक समितीमध्ये**

१) स्वंयसेवी संस्था प्रतिनिधी — १
२) आरोग्य विभागातील सेवानिवृत्त अधिकारी — १
३) सहाय्यक संचालक दर्जाचा अधिकारी — १
४) मंत्रालयातील कक्ष अधिकारी/ अवर सचिव -- १
५) पत्रकार — १ अशा एकूण ५ जणांचा समावेश असेल.

प्रत्येक समितीचे प्रमुख सहसंचालक/ उपसंचालक दर्जाचा अधिकारी असेल.

उपरोक्त समितीमधील पत्रकारांची नांवे माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या संमतीने निश्चीत करण्यात येतील.

याकरीता लागणारा आवश्यक निधी वित्त विभागाच्या मान्यतेने यथावकाश वितरीत करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक- २०११०२०२१५४७२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुहास रा. चव्हाण)
कार्यासन अधिकारी

प्रति,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), पुणे.
उप संचालक, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
उप संचालक, आरोग्य सेवा, सर्व विभागीय मंडळे.
जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (आरोग्य-९).